मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करावयाच्या कामांवरील सेन्टेज चार्जेस बाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः विकास २०१७/प्र.क्र.१९०/यो-६
बांधकाम भवन, फोर्ट मुंबई- ४०० ००१
दिनांक: ४ ऑक्टोबर २०१७

वाचा -

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास व जलसंधारण विभाग विकास-२०१५ /प्र.क्र. ५२/यो-६, दि. २७ मार्च, २०१५

२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास व जलसंधारण विभाग विकास-२०१७ /प्र.क्र. १८२/यो-६, दि. ३१ मार्च, २०१७

प्रस्तावना -

मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गांवातर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (२५१५ १२३८) या योजनेंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये एकुण रू.६९७४८.५९ लक्ष एवढया निधीचे प्रशासकीय आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या निधींपैकी जिल्हा परिषदेला रू.२३२४६.२६ (लक्ष) व सार्वजनिक बांधकाम मंडळला रू. ४६५०२.३३ (लक्ष) इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेला निधी मार्च २०१७ अखेर व्यपगत होत असल्याने संदर्भ क्र. २ अन्वये जी कामे ३१ मार्च २०१७ रोजी सुरू झालेली नव्हती ती कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा परिषदकडे वर्ग करण्यात आलेली आहेत.

२. तथापि, जिल्हा परिषदकडे वर्ग करण्यात आलेली कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पुन्हा वर्ग करण्याबाबत बहुतांश लोकप्रतिनिधींनीची मागणी होत आहे. परंतु जिल्हा परिषदांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करत असताना नियमांनुसार ५% सेन्टेज चार्ज म्हणून (centage charge) म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाला अदा करावयाचे असतात. तथापि सेन्टेज चार्ज बाबतचा निधी जिल्हा परिषदकडे किंवा या विभागाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे योजनेंतर्गत (२५१५१२३८) कामे जिल्हा परिषदकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करताना सेन्टेज चार्ज अदा करणे शक्य होत नाही.त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे .

शासन निर्णय -

मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम मंडळांना मंजूर केलेल्या तथापि संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेकडे वर्ग केलेली कामे पुनश्च सार्वजनिकबांधकाम विभाग/मंडळास वर्ग करताना सेन्टेज चार्ज आकारण्यात येऊ नये .सदर निर्णय सन २०१६-१७ मधील निधीबाबतच लागू करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ३६०७/सा.बा. दि. २५/०९/२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००४१८०५४७५७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay G Chandekar

Digitally signed by Vijay G Chandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6c45102bd1a0b53d3ebeac67e146b5762d1a4e7c6fc72cf34367b3943718b2a4, cn=Vijay G Chandekar
Date: 2017.10.05 14:46:16 +05'30'

(विजय चांदेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सर्व) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व) विधानमंडळ, मुंबई.
६. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय मुंबई.
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय मुंबई.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११. विभागीय आयुक्त (सर्व).
१२. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सर्व
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१५. सर्व /उप सचिव/ विकाअ/ अवर सचिव/ कार्यासन अधिकारी सह सचिव.ग्रा.वि व ज.सं.विभाग